# नवीन आर्थिक सुधारणाची पार्श्वभूमी

प्रा. तेलंग शैलेंद्र देविदास
लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ

## प्रस्तावना

भारतात नवीन आर्थिक सुधारणाची सुरवात १९९१ला झाली. यालाच LPG पॉलीसी म्हणतात. (liberalization, privatisation and globalisation) उदारिकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण (खाऊजा) म्हणून ओळखले जाते. यालाच new economic reforms since 1991 म्हणतात. आज जगातील राष्ट्रांची सम्मती आहे की आर्थिक विकास म्हणजे सर्व काही नाही. त्याच प्रमाणे एकूण राष्ट्रीय उत्पन्न यावरून समाजाच्या प्रगतीचा अंदाज येत नाही. तर समाजात मानवी विकासाच्या निर्देशांकाद्वारे देशाची प्रगती मोजली जाते. जगाचा विचार करता असे लक्षात येते की कोणताही देश हा भांडवल, नैसर्गिक साधने, भूमी, श्रम व कौशल्य या बाबतीत स्वयंपूर्ण नाही. प्रत्येक देशात यापैकी काही साधने विपुल प्रमाणात तर काही दुर्मिळ आहेत. म्हणूनच संपूर्ण विश्वातील मानवी कल्याणात भर पडावी या हेतूने जागतिक स्तरावर LPG ची सुरुवात झाली. त्याचे कमी जास्त प्रमाणात सर्वच देश फायदा घेत आहेत.पण याचा बहुतांश फायदा हा विकसित देशांना झालेला दिसतो. तर अविकसित व मागास देशांना याचा फारसा फायदा मिळाला नाही. याचा बहुतांश फायदा बहुराष्ट्रीय कंपन्यांना व भांडवलदारांना झाला आहे. LPG पॉलीसीचा भारताला किती फायदा झाला व किती नुकसान झाले याचा आढावा घेणे व त्यातून अधिक चांगला मार्ग कसा काढता येईल याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. नवीन आर्थिक सुधारणा यालाच राव-मनमोहन सुधार LPG सुधार, IMF, WORLD BANK सुधार असेही म्हणतात.

भारताला स्वतंत्र मिळण्यापूर्वी भारत २०० वर्ष गुलाम होता. इंग्रज भारतातील कच्चा मालावर प्रक्रिया करून पक्का माल भारतात विकायचे. थोडक्यात भारताकडे मोठी बाजारपेठ म्हणून पाहायचे व त्यातून त्यांनी भारताची मोठी लुट केली. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताच्या विकासाची वाटचाल नियोजनाच्या माध्यमातून १९५०-५१ ला सुरु झाली. परंतु १९९०-९१ च्या दरम्यान भारतावर मोठे आर्थिक संकट कोसळले. त्यातून मार्ग काढण्यासाठी भारताने LPG चा स्वीकार केला. आज संपूर्ण विश्व हे एकमेकांशी कोणत्या ना कोणत्या कारणाने जोडले गेले आहे.पहिले सर्व देशाच्या अर्थव्यवस्थेला विश्वाशी जोडले गेले. नंतर अर्थव्यवस्थेला खाजगीकरण केले व देशाचे धोरण उदार करण्यात आले.भारताची अर्थव्यवस्थाही मिश्र आहे म्हणजेच सार्वजनिक व खाजगी अशा दोन्ही क्षेत्रात काम करते. सोबत काम करते सार्वजनिक क्षेत्र हे 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर काम करते. तर खाजगी क्षेत्र हे फक्त नफा कसा जास्तीत जास्त मिळेल या तत्त्वावर काम करते.

भारताची अंतर्गत अर्थव्यवस्था ही फारशी मजबूत नव्हती म्हणजे मागणी व पुरवठ्यात असंतुलन होते. परिणामतः भारताची आयात जास्त व निर्यात कमी होती. थोडक्यात भारताचा व्यापार शेष हा तुटीचा होता. म्हणून भारताला देणे जास्त व घेणे कमी होते. त्यातून विदेशी विनिमयाची समस्या निर्माण झाली. जेमतेम १५ दिवस पुरेल इतकेही विदेशी चलन भारताकडे १९९१ च्या काळात उपलब्ध नव्हते. याची कमतरता ही कर्ज घेऊन पूर्ण करता येते. या करिता भारताने जागतिक अधिकोश व आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीची मदत घेतली व त्या करिता तारण म्हणून भारतातील सोने ठेवले व काही अटीची पूर्तता केली, तरच भारताला ७ मिलियन डॉलरचे कर्ज मंजूर केले. या अंतर्गत भारतात अनेक सुधारणा करण्यात आल्या. त्यालाच new economic policy (NEP) म्हणतात. १९९० च्या आधी भारताची अर्थव्यवस्था बंद अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जायची ती खुली करण्यात आली. म्हणजे आयात निर्यातीवरील निर्बंध कमी करण्यात आले.

१९९१ च्या आधी भारतात आर्थिक संकट आले. पहिले आर्थिक संकट १९४७ ला आले. त्यावेळी भारताला सोने गहन ठेवावे लागले. दुसऱ्यांदा. १९८०-८३ ला जागतिक मंदी आली भारताच्या विदेशी व्यापारात निर्यातीत मोठ्या प्रमाणात घट झाली व्यापारातील नुकसान ५४००० करोड रु पोहचले. १९८८ ला आंतरराष्ट्रीय मुद्रा निधी (IMF) ने भारतीय अर्थव्यवस्थेत बदल करण्याची सूचना दिली पण त्याला कॉंग्रेस सरकारने विरोध केला. भारतात बंद अर्थव्यवस्था होती भारत मोठ्या प्रमाणात सोवियत संघाला निर्यात करत होता. परंतु १९८७ सोवियत संघाचे विघटन झाले. त्याचा प्रभाव भारताच्या निर्यातीवर झाला. याशिवाय बोफार्स घोटाळा, भारतातील राजनीतिक स्थिती बिकट होत गेली . त्यामुळे कॉंग्रेस सरकारला सत्तेत येता आले नाही, याचा परिणाम भारतातील उद्योगधंदे चौपट झाले.

**भारताची आर्थिकस्थिती कमजोर होण्याची मुख्य करणे :**

१. लायसेन्स राज.
२. १८ मोठ्या सेक्टर मध्ये सार्वजनिक आरक्षण बंद करून सरकारकडून किंमत अर्थव्यवस्थेला सरकार कडून किंमत ठरवली जायची.

१९९० च्या काळात चंद्रशेखर सरकार सत्तेमध्ये आले त्या काळात RBI चे गव्हर्नर एस वेंकट रमन हे होते. वरील सर्व कारणांचा परिणाम भारताच्या आर्थिक संकटात भर पडत गेली. त्यावर उपाय म्हणजे भारतातील सोने गहाण ठेवणे हाच एक उपाय होता. वित्त मंत्री यशवंत सिन्हां यांच्या संमतीने २० हजार किलो सोने स्विझरलेंड सरकार कडे आणि ४७००० किलो सोने इंग्लंड आणि जपान च्या बँकेकडे गहाण ठेवले. यातून भारताला ११००० करोड मिळाले. पण ते पुरेसे नव्हते. कारण इराक युद्धा मुळे भारताचा पेट्रोल आयातीवरील खर्च महिन्याचा ५०० करोड वरून १२०० करोड रुपये झाला. यातून मार्ग काढण्यासाठी भारताने IMF ची मदत घेतली. पण या संस्थेत अमेरिकेचे मताधिकार ८० % होते. त्यामुळे अमेरिकेने भारताकडे एक अट ठेवली की युद्ध करण्याकरिता विमानात इंधन भरण्याची परवानगी मागितली व भारताला १ अरब ३ करोड रुपयाचे कर्ज दिले. हे सर्व केबिनेट ची परवानगी न घेता व लोकांना माहिती न होता केले गेले. ही राजनीतिक उलथापालथ झाली व कॉंग्रेस सरकार सत्तेत आले. त्यावेळी वित्तमंत्री मनमोहनसिंग होते. या आर्थिक संकटातून बाहेर निघण्यासाठी LPG म्हणजे उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरणाची सुरुवात केली. सोबत रुपयाचे अवमूल्यन केले व अर्थव्यवस्था खुली केली. भारताच्या मिश्र समाजवादी अर्थव्यवस्थेचे मिश्र भांडवलवादी अर्थव्यवस्थेत रुपांतर केले गेले.

**१९९१ नवीन आर्थिक धोरणाची सुरुवात करण्याची कारणे :**

स्वातंत्र्या नंतर म्हणजे १९५० ते १९९० च्या कालावधीचा विचार केला असता त्या काळात महागाईचा दर जास्त होता. भारताचा व्यापारशेष तुटीचा होता. रुपयाचे मूल्य कमी झाले. पब्लिक सेक्टर धोक्यात होते. यातून मार्ग काढण्यासाठी जागतिक संघटनांनी म्हणजे IMF व जागतिक अधिकोष यांच्या कडून भारताने आपल्या आर्थिक धोरणात बदल करावा तरच भारतावरील कर्जाचा डोंगर कमी होऊ शकतो. म्हणजे भारताने नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला पाहिजे. १९९१ मध्ये भारताची आर्थिक परिस्थिती अधिक बिकट झाली होती. १५ दिवस पुरेल इतकेही विदेशी चलन शिल्लक नव्हते. त्यातून कर्जाचे व्याज देणेही शक्य नव्हते. त्याच सोबत आयातीचे देणे शक्य नव्हते. असे असतांना भारताला कर्ज घेण्याशिवाय पर्याय नव्हता. पण भारताला कर्ज तेव्हाच मिळणार होते जेव्हा भारत आपल्या आर्थिक धोरणात बदल करेल म्हणजे LPG पोलीसीचा स्वीकार करेल. या परिस्थितीतून बाहेर येण्याकरिता RBI ला सोने तारण ठेवावे लागेल.

नवी आर्थिक धोरणाची सुरुवात १९९१मध्ये करण्यात आली. त्यावेळी पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव होते तर अर्थमंत्री मनमोहनसिंग होते. याचे उद्दिष्ट आर्थिक अडचणीतून बाहेर येणे व विकास करणे हा होता. त्यासाठी LPG सुरु करणे व मागील ४० वर्षात विकासाच्या संदर्भात येणाऱ्या अडचणी दूर कारणे हा होता.

उदारीकरण म्हणजे उत्पादन करतांना ची बंधने आहेत ती उदार कारणे ( लायसन्स राज समाप्त करणे ) म्हणजे अर्थ व्यवस्थेत उत्पादन मुक्त करणे होय . उदारीकरणाच्या काळात बरेचसे उत्पादन सरकार करायचे व त्यावर नियंत्रणे होती ही नियंत्रणे खुली केली तरच विकास होईल असे सरकारच्या लक्षात आले त्यामुळे सरकारने यात सुधारणा करण्याचे ठरविले म्हणजे उद्योगाचे उदारीकरण केले व त्यासाठी खालील सुधारणा केल्या.त्या मध्ये विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक FDI सुधार, औद्योगिक सुधार, वित्त सुधार, कर सुधार, विदेशी वित्तीय सुधार , विदेशी व्यापार सुधार या सारख्या या सारख्या सुधारणा करण्यात आले.

**खाजकीकरण :** याचा अर्थ उद्योग करणे खुले करण्यात आले म्हणजे उद्योग कोणीही कुठेही करू शकतो. याला थोडक्यात PSU म्हणतात.यात महारत्न, नवरत्न व मिनीरत्न ह्या कंपन्या येतात. यात सरकारी उद्योग खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरित केले गेले. यात निर्गुंतवणूक करण्यात आली. अर्थव्यवस्थेत खाजगी क्षेत्राचा समावेश करणे जागतिकीकरण- कोणीही कुठेही उद्योग करू शकतो, उत्पादित वस्तू व सेवा खरेदी विक्री खुली करण्यात आली. उदा. भारतात श्रम स्वस्त व भांडवल महाग आहे. तर अमेरिकेत या उलट आहे. म्हणून अमेरिका भारताच्या स्वस्त श्रमाचा उपयोग करून घेईल. थोडक्यात वस्तू व सेवांचे उत्पादन ज्या देशात स्वस्त असेल त्या देशात करणे. LPG च्या धोरणात WTO ( विश्व व्यापार संघटन ) ची भूमिका महत्वाची आहे. यालाच दुसऱ्या नावाने म्हणजे GATT (गॅट ) या नावाने ओळखले जायचे.

सुधारणा काळात भारताच्या अर्थव्यवस्थेवर काही परिणाम दिसून आले. त्यात १९८०-९१ मध्ये ५.६ % असलेला आर्थिक विकासाचा दर वाढून २००७-१२ मध्ये ८.२ % झाला. कृषी क्षेत्राच्या उत्पादनात घट झाली, उद्योग क्षेत्रात चढ उतार पाहायला मिळाले.तर सेवा क्षेत्राचा विकास व विस्तार झाला. आज सेवा क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा सर्वाधिक आहे म्हणजे देशाचा विकास होत आहे. पण भारतासारख्या कृषी प्रधान देशात कृषी क्षेत्रावर निर्भर असण्याचे प्रमाण ६०% च्या जवळपास आहे व या क्षेत्राचा वाटा१८ ते २० % च्या जवळपास आहे. त्यामुळे कृषी क्षेत्राशी संबंधिताची उपेक्षा झाली त्या क्षेत्रावर अधिक वाईट दिवस आले. हा नवीन आर्थिक धोरणाचा गंभीर परिणाम आहे या धोरणाचे काही चांगलेही परिणाम आहेत. यामुळे आयती स्वस्त झाल्या कृषी उत्पादनात वाढ झाली म्हणजे अन्नधान्याच्या बाबतीत भारत स्वयंपूर्ण झाला.

**नवीन आर्थिक सुधारणाची गरज का पडली.**

स्वातंत्र्य नंतर भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. त्याकरिता सरकारने नवीन कायदे बनवले ह्या कायद्याची बंधने अवाजवी होती. खाजगी क्षेत्रावरील बंधनामुळे खाजगी क्षेत्राचा विकास त्या काळात झाला नाही व सरकारी क्षेत्राचाही विकास झाला नाही असे करण्याचे कारण म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेला विदेशी अर्थव्यवस्थेपासून दूर करणे. सरकारी नियंत्रणात खाजगी व सार्वजनिक क्षेत्र प्रगती करेल असे सरकारला अपेक्षित होते पण या उलट झाले. या सर्वांचा परिणाम म्हणजे--

१. वित्तीय तुट वाढली (Fiscal Deficit ) १९८०-८१ – ५.४ % GDP

१९९०-९१ – ८.४ % GDP सरकारचा खर्च जास्त व उत्पन्न कमी होते व ही तुट वाढत गेली. वित्तीय तुती मुळे महागाई वाढत होती. त्यामुळे मानवी जीवनाचा दर्जा घातला व भारतीय अर्थव्यवस्था कर्जाच्या जाळ्यात अडकली, त्यामुळे आंतरराष्ट्रीय संस्थांचा विश्वास भारतीय अर्थव्यवस्थेवर राहिला नाही परिणामी भारताची पत घटली.

२. Balanace of Payment Deficit : (शोधनशेष प्रतिकूल )

शोधन शेषाचे दोन खाते असतात.

अ) चालू खाते

आ) भांडवली खाते

१९८०-८१-> २२१४ करोड शोधनशेष चालू खात्यातील तुट

१९९०-९१-> १७३६७ करोड शोधनशेष चालू खात्यातील तुट वाढली म्हणजे आयात सतत वाढत गेली व निर्यात कमी झाली परिणामतः भारताचा शोधनशेष

हा तुटीचा झाला. ही तुट कमी करण्यासाठी विदेशी कर्ज घेण्यात आले. भारतावरील विदेशी कर्जात वाढ झाली.

१९८०-८१ ->१२ % GDP

९९०-९१-> २३ % GDP

निर्यातीचा १५ % वाटा १९८०-८१ मध्ये द्यावा लागत होता तो वाढत जाऊन ३० % झाला. १९९०-९१ च्या दशकात द्यावा लागला. याच काळात इराक युद्ध झाल्याने पेट्रोल च्या किंमतीत प्रचंड वाढ झाली.

३. **विदेशी चलनाचा साठा कमी-** भारतातील विदेशी चलन साठा जवळपास संपूर्ण संपला होता. १९८६-८७ -> ८१५१ करोड, १९८९-९० -> ६२५२ करोड या परिस्थिती मुळे भारतीय रिझर्व बँकेला जागतिक अधिकोषाकडे सोने तारण ठेवावे लागले.

४. महागाईत वाढ: १९९०-९१ मध्ये महागाई दर हा १६.७ % होता याच्या तीन वर्षा आधी मान्सून अनुकूल होता. तरी अन्नधान्याच्या किमतीत भरमसाट वाढ झाली. महागाई वाढण्याची अनेक कारणे आहेत. त्यातील महत्वाचे कारण म्हणजे मुद्रेच्या पुरवठ्यात वाढ हे महत्वाचे आहे.

५. सार्वजनिक क्षेत्राच्या उत्पादनात घट : सार्वजनिक क्षेत्रावर या सर्वांचा प्रतिकूल परिणाम झाला. भारताने शर्ती मान्य केल्याने ७ मिलियन डॉलरचे कर्ज मिळाले.

या सर्वातून मार्ग काढायचा असल्यास भारताला नवीन आर्थिक धोरणाची (New Economic Policy )म्हणजे खाजगीकरण, उदारीकरण याला स्वीकारण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय आंतरराष्ट्रीय संस्थेने ठेवला नाही.

**LPG धोरणाचे फायदे**

१. GDP मध्ये वाढ झाली.
२. औद्योगिक उत्पादनात वाढ IT उत्पादनात सुद्धा LPG मुळे वाढ झाली.
३. वित्तीय तुट कमी झाली त्यामुळे गुंतवणुकीत वाढ झाली.
४. महागाई दर कमी झाला त्यासोबत व्याज दर सुद्धा कमी झाला.
५. गुणवत्तापूर्ण व दर्जेदार वस्तूच्या उत्पादनात वाढ झाली व ग्राहकास वस्तू स्वस्त मिळू लागल्या.
६. विदेशी विनिमय साठ्यात वाढ झाली.
७. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक FDI च्या गुंतवणुकीच्या दारात वाढ झाली.
८. भारताची पत आंतराष्ट्रीय पातळीवर वाढली.
९. भारतीय बाजारपेठेचे स्वरूप बदलले म्हणजे एकाधिकारशाही संपली व स्पर्धात्मक बाजारपेठेला सुरुवात झाली.
१०. सेवा क्षेत्राची प्रगती झाली त्या मुळे सेवा क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा वाढला.

**LPG धोरणाचे तोटे / दुष्परिणाम**

१. कृषीक्षेत्रातील सरकारची गुंतवणूक व सबसिडी कमी झाली त्यामुळे कृषिक्षेत्राचा खर्च वाढला व शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान झाले.
२. ग्रामीण अर्थव्यवस्था कृषी वर निर्भर असते LPG चा कृषीक्षेत्रावर वाईट परिणाम झाला परिणामतः ग्रामीण अर्थव्यवस्थेत बेकारी वाढली.
३. उपभोग्य वस्तूच्या उत्पादनात घट झाली, त्यामुळे उपभोग्य वस्तूच्या किंमतीत वाढ झाली.
४. भारतातील उत्पादित वस्तू व सेवा आंतराष्ट्रीय वस्तू व सेवांशी तुलनात्मक दृष्ट्या स्पर्धा करू शकली नाही.
५. आयातीत वाढ झाली.
६. सार्वजनिक क्षेत्रात निर्गुंतवणुकीत वाढ झाली. फायद्यात असणारे सार्वजनिक उपक्रम कवडीमोल भावाने भांडवलदाराला विकले.
७. आर्थिक विषमतेत वाढ झाली.
८. बहुराष्ट्रीय कंपन्यांची भारतात मनमानी सुरु झाली.
९. उधारीच्या व्यवहारात वाढ झाली त्यामुळे ग्राहक कर्ज बाजरी झाला.
१०. प्रांतीय विषमता व क्षेत्रीय विषमता वाढली.
११. भारतीय संस्कृतीचा स्तर व सामाजिक स्तर खालावला.

**संदर्भ सूची :**

१. भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र- डॉ.जी.एफ.झामरे, पिंपळापुरे अँड कं पब्लिशर्स, नागपूर.
२. जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने-प्रा.जगन कराडे, प्रथम आवृत्ती २००८, डायमंड पब्लिकेशन पुणे.
३. जागतिकीकरण नवीन गुलामगिरी- अँडमिरल विष्णू भागवत, समता प्रकाशन, नागपूर १७
४. भारतीय अर्थव्यवस्था और जनता कि दुर्दशा-अँडमिरल विष्णू भागवत, समता प्रकाशन, नागपूर १७
५. भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल-प्रा.शरद शंकर जोशी, डायमंड बुक डेपो, पुणे
६. भारताच्या आर्थिक समस्या- भाग २ डॉ.मधुसुधन दत्तात्रय साठे, डायमंड पब्लिकेशन पुणे.
७. ग्रामीण भारत की चुनौतियाँ- तपन कुमार पंडा, मार्क पब्लिशर्स जयपुर
८. नव्या जगाचे अर्थकारण- डॉ.मधुसुधन दत्तात्रय साठे, डायमंड पब्लिकेशन पुणे.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com